## प्रेस नोट दिनांक ०९/०६/२०१८

## मोटार सायकल चोरास युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरने केली अटक

पुणे शहरात वाहन चोरीच्या गुन्हयांच्या वाढत्या प्रमाणास आळा घालण्यासाठी युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी पेट्रोलींग करीत असतांना पो.हवा. रिजवान जिनेडी व तुषार खडके यांनी त्यांचे खास बातमी दाराने बातमी दिली की, छत्रपती शिवाजी संकुल, मंगळवार पेठ, पुणे येथे एक मोटारस सायकल चोरी करणारा आरोपी त्याचेजवळ हिरो होंडा कंपनीची स्पलेंडर मो.सा. काळया रंगाची, तिचा आरटीओ नं. एमएच१२ जीए१७८६ हिचेसह उभा आहे. सदर बातमी वरीष्ठांना सांगून कायदेशीर कारवाईचा आदेश दिल्याने बातमी प्रमाणे खात्री करून छापा टाकून आरोपी नामे गणेश सिध्दू पाटोळे, वय २७ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली नं. ३, काकडेवस्ती, गणपती मंदीरा शेजारी, कोंढवा बु. पुणे यास ताब्यात घेतले.

त्यास विश्वासात घेवून चौकशी केली असता, त्याने साधारण २० ते २५ दिवसापूर्वी मार्केटयार्ड येथून सदरची मोटार सायकल चोरी केलेबाबत सांगीतले. सदरबाबत मार्केटयार्ड पो.स्टे. येथे अभिलेखाची पहाणी केली असता सदरबाबत गु.रं.नं. ८९/२०१८ भादविक. ३७९ अन्वये गुन्हा दाखल असलेचे समजलेने सदर आरोपीस पुढील तपासकामी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे. त्याचेकडून एक मोटार सायकल कि.रु. २५,०००/- जप्त करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, हर्षल कदम, व पोलीस कर्मचारी रिजवान जिनेडी, तुषार खडके, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, सचिन जाधव, तुषार माळवदकर, प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, विजेसिंग वसावे, अशोक माने, यांनी केली आहे.